"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। वादे वादे जायते तत्त्वबोधः।।

मूल्य रु. ५

क्रमांक २ वर्ष : ३७ जुलै-सप्टेंबर २०१५

**BOOK PACKET (PERIODICAL)**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## ठाणे मंच आयोजित
## 'दोन दिवसांचा हॉलिडे कॅम्प व आरोग्य शिबीर'

**डॉ. श्रीधर सुधाकर कुलकर्णी, एम्.एस्.(ऑर्थो)**

**यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरांशी गप्पा मारण्याचा एक विशेष कार्यक्रम**

**- सहभाग -**

- डॉ. शिवराम ( प्रसाद) नाडकर्णी, नेत्रविकारतज्ज्ञ
- डॉ. गिरीश लाड, पोटांच्या विकाराचे तज्ज्ञ

**स्थळ** : ऑर्चर्ड रिसोर्ट, बोर्डी, डहाणू (मुंबईहून १८० किमी)

**तारीख** : शनिवार १० ऑक्टोबर ते रविवार ११ ऑक्टोबर

**आकार** : रु. २८०० प्रत्येकी, बस प्रवासासह.

(वरील रक्कम आपल्या बँकेच्या नौपाडा, ठाणे शाखेत, खाते क्र. १८१६ मध्ये भरण्याची सोय.)

बसच्या क्षमतेमुळे जागा मर्यादित, तरी इच्छुकांनी निराशा टाळण्यासाठी त्वरा करा.

**सुरेश पालेकर : ९९६९४५५३७०**

**मंजिरी कुलकर्णी : ९६६५०९८११७** **राजू बोरकर : ९८२०९१७८४१**

## विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा संघातर्फे सत्कार

नेहमीच्या प्रथेनुसार यंदाही २२ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात २०१५ ह्या वर्षात विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांना व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना ज्ञातीतर्फे स्मृतिचिन्हे देऊन त्यांचा सत्कार करण्यात येईल. संबंधित व्यक्तींनी किंवा त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांची संपूर्ण नावे, पत्ता व टेलिफोन नंबर ३० सप्टेंबर २०१५ पर्यंत संघाच्या पत्त्यावर पाठवून किंवा टेलिफोनवर कळवून आम्हांस उपकृत करावे.

**१ ऑक्टोबर नंतर अशी नावे आल्यास ऐनवेळी ही स्मृतिचिन्हे तयार करणे कठीण जाते याची कृपया दखल घ्यावी.**

## हळदीकुंकू समारंभ : भगिनींस आमंत्रण

नेहमीचा श्रावणातला हळदीकुंकू समारंभ यंदा जोगेश्वरी व मुलुंड येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य उपस्थित राहावे.

| | जोगेश्वरी | मुलुंड (पू) |
|---|---|---|
| तारीख | : शुक्रवार ११ सप्टेंबर | शुक्रवार ११ सप्टेंबर |
| स्थळ | : रामेश्वर मंदीर<br>सरस्वती बाग, जोगेश्वरी (पू) | सौ. लता पिकळे यांच्या घरी (९८२०५६१०९१)<br>४०४ गायत्री बिल्डिंग, हनुमान चौक, मुलुंड(पू) |
| वेळ | : संध्याकाळी ५ ते ७ | संध्याकाळी ५ ते ७ |
| | **संघ कार्यकारिणी तर्फे** | **ठाणे मंच कार्यकारिणी तर्फे** |
| | जयश्री भेडसगांवकर, शांता पालेकर | लता पिकळे मंजिरी कुलकर्णी |

# संपादकीय

## श्रीमती मृदुलाभांडारकर हिच्या संघ व एज्युकेशन सोसायटीच्या अखंडित सेवेचे रौप्यवर्ष

कुठल्याही संस्थेचे कार्य सक्षमपणे चालवायचे असेल तर कार्यालयात दैनंदिन व्यवहार पार पाडणारी व्यक्ती ही निष्ठेने काम करणारी हवी. सुदैवाने संघाला व एज्युकेशन सोसायटीला तन मन धन झोकून निरलसपणे कार्यालय सांभाळणारी व्यक्ती मिळाली आहे. ही व्यक्ती म्हणजे आता बहुतेकांच्या परिचयाची झालेली श्रीमती मृदुला भांडारकर. तिने उभय संस्थांमध्ये १९९० च्या अखेरीस कामास सुरुवात केली, म्हणजे यंदा तिच्या सेवेचे रौप्यवर्ष. गेली पंचवीस वर्ष तिने आपले कार्य कधीही न बेजारता हसतमुखाने केलेले आहे. उभय संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारणसभा, कवळें मठ संस्कृत पाठांतर स्पर्धा, वार्षिक ज्ञातिसंमेलन गेली २५ वर्षे एकाही वर्षाचा खंड न पडूं देता निर्विघ्नपणे पार पाडण्यात तिचे योगदान महत्त्वाचे आहे. प्रत्येक प्रसंगी सभागृहात सर्वप्रथम हजर राहून कार्यक्रम संपल्यावर पसारा आवरण्यासाठी शेवटपर्यंत उपस्थित राहणारी एकमेव व्यक्ती म्हणजे मृदुला.

तिच्या कार्याविषयी थोडक्यात सांगायचे म्हणजे पु. लं. च्या 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकांतील 'नारायण' यांच्याशी तिची तुलना करता येईल. विवाहाच्या मंडप रूपी रणांगणावर नारायण चोहोंकडून शत्रूंचे वार झेलणाऱ्या रणमर्दाच्या थाटांत आज्ञा हुकुम आनंदाने झेलीत असतात. मृदुला पण आपल्या कामांच्या अंतर्गत अनेकांचे टोमणे, उपमर्द, विनंती कौतुक आनंदाने झेलीत असते.

मृदुलाचे समस्त ज्ञातिबांधव ऋणी आहेत व तिचे कौतुक जाहीरपणे करण्यासाठी हा प्रपंच.

१ जुलै २०१५



दि. ना. नाडकर्णी

# एज्युकेशन सोसायटी : गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांस बक्षिसे

दरवर्षी ज्ञातीच्या स्नेहसंमेलनांत ज्ञातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठी बक्षिसे दिली जातात. त्यानुसार यंदाही २२ नोव्हेंबर २०१५ रोजी भरणाऱ्या स्नेहसंमेलनांत बक्षिसे दिली जातील. बक्षिसांची पात्रता पुढील प्रमाणे :

| परीक्षा | | किमान पात्रता |
|---|---|---|
| दहावी | | ८०% |
| बारावी – | विज्ञान (वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश घेतला असेल तर अर्जात तसे नमूद करावे.) | ७५% |
| | वाणिज्य | ७०% |
| | कला | ६५% |
| पदवी व सरकारमान्य डिप्लोमा | | ६०% |
| एम.ए., एम.कॉम, एम.एस्सी. पीएच.डी, वैद्यकीय क्षेत्रातील पदवी एम.बी.ए., सी.ए., कॉस्ट अकौंटस, कंपनी सेक्रेटरी, पदव्युत्तर डिप्लोमा इत्यादी, | | उत्तीर्ण |
| परदेशांत घेतलेली पदवी | | ए ग्रेड |

तसेच किमान राज्य पातळीवरील क्रीडास्पर्धेत ज्यांना पदके मिळाली असतील किंवा जे स्कॉलरशिप परीक्षेत गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झाले असतील तर संबंधितांनी त्याचाही तपशील पाठवावा. कार्यकारिणी अशाही अर्जांचा विचार करील.

**अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख १ ऑक्टोबर २०१५**

विद्यार्थ्यांनी गुणवत्ता पत्रिकेची प्रत (झेरॉक्स), टेलीफोन नंबर व संपूर्ण पत्ता. The NKGSB Ind & Education Society, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai 400004. या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

- ☐ विद्यार्थ्याच्या वडिलांचे मूळ गांव उत्तर कानडांत असावे व ते स्मार्त कवळे मठानुयायी असावेत किंवा आई माहेरच्या तिथल्या असून सारस्वत पोटजातीतील गृहस्थाशी विवाहबद्ध असल्या पाहिजेत.
- ☐ बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी एम.बी.बी.एस., जर्नेलिझम किंवा बी.कॉम. शाखेत प्रवेश घेतल्यास तसे नमूद करावे.
- ☐ ज्या डॉक्टर्सनी एम्.एस्. किंवा एम्.डी. साठी प्रवेश घेतला आहे, त्यांनाही काही पुरस्कृत बक्षिसे आहेत. संबंधितांनी याचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावा.

# प्रकाशझोत

## ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक श्री. दुर्गानंद गायतोंडे यांचा राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते गौरव

२६ जून रोजी पुणे येथील बालगंधर्व रंगमंदीर येथे " पुण्यभूषण फाऊंडेशन " या संस्थेच्या पुरस्कार प्रदान सोहळयाच्या अंतर्गत पुण्यातील ५ जेष्ठ स्वातंत्र्य सैनिकांचाही गौरव करण्यात आला. त्यामध्ये ९६ वर्षीय श्री. दुर्गानंद गायतोंडे यांचाही समावेश होता. स्थानिक वृत्तपत्रांत या गौरवसमारंभाला फोटोसकट भरपूर प्रसिद्धी मिळाली होती.

तसेच ५ जुलै रोजी प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ यांनी गायतोंडे यांच्या निवासस्थानी त्यांची प्रदीर्घ मुलाखत घेतली. त्याचे प्रक्षेपण IBM लोकमत या चॅनेलवरून दाखविण्याचा प्रस्ताव आहे.

## श्री अनिल नाडकर्णी यांचा " किमया लाल खुर्चीची " हा दुसरा कथासंग्रह प्रकाशित

पारले येथील श्री. अनिल मंगेश नाडकर्णी यांचा ' तिरपीट ' हा विनोदी कथासंग्रह १९९८ साली मॅजिस्टिक प्रकाशनाने प्रसिद्ध केला होता . त्यांनी बावाजींचा भरणा असलेल्या सेन्ट्रल बँकेत काम केले होते.या कथासग्रहात पु. लं. च्या ' बटाटयाची चाळ ' च्या धर्तीवर बँकेतील कर्मचाऱ्यांच्या विविधांगी जीवनाच्या अनुभवावर मिश्कील अशा कथा आहेत. अर्थात त्यातील पात्रे व प्रसंग काल्पनिक असून ते वास्तवाशी जुळणाऱ्या आहेत. त्याचाच दुसरा भाग म्हणून अलीकडे त्यांचा ‘किमया लाल खुर्चीची’ हा कथाप्रसंग प्रकाशित झाला आहे. यांत एकून ७ कथा आहेत व त्या सर्व वाचकांना खिळवून टाकण्याऱ्या आहेत.

(' किमया लाल खुर्चीची ' पृष्ठ संख्या १२८, मूल्य : रु १५५,
प्रकाशक : राही प्रकाशन, गोवा - ९८२३८१३०३९)

## " पायोनियर्स एक मंगळ यात्रा " डॉ. जयंत तेलंग लिखित वैज्ञानिक रहस्य कथा

अंधेरी येथे राहणारे डॉ. जयंत विनायक तेलंग हे मुंबई महानगरपालिकेतून एक्झीक्युटीव्ह हेल्थ ऑफीसर या पदावरुन निवृत झालेले आहेत.त्यांनी आतांपर्यत आठ वैज्ञानिक रहस्य कथा प्रकाशित केलेल्या आहेत व अमेरिकेत एका प्रकाशन संस्थेतर्फे(kindle.com/ Amazon.com)E-book च्या स्वरुपात त्या विक्रीस उपलब्ध आहेत. आपल्या ज्ञातिबांधवासाठी डॉ. तेलंग या कथा विनामूल्य देऊ इच्छितात. मोबाइल, आय पॅड अथवा लॅपटॉवर त्या वाचता येतील. इच्छुकांनी आपल्या ई-मेलवर त्यांच्याशी jvt201@yahoo.co.in ई-मेल आयडीवर संपर्क साधावा.

हा कथा संग्रह मराठीत छापील स्वरुपात प्रकाशित होण्याच्या मार्गावर आहे.

**शतकवीर श्री. पांडुरंग बर्डे - प्रेसीडेन्ट ओबामाकडून सुद्धा अभिनंदनपर संदेश**

सध्या अमेरिकेत वास्तव्याला असलेले श्री. पांडुरंग (दिगंबर) गणपत बर्डे यांना ७ मे २०१५ रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली याबद्दल त्यांचे अभिनंदन. प्रेसीडेन्ट ओबामा यांनी सुद्धा त्यांना अभिनंदन पर संदेश पाठविला आहे. श्री. बर्डे आपल्या संघाचे सभासद आहेत एवढेच नव्हे तर हितचिंतकही आहेत.गेली सुमारे दहा वर्षे प्रतीवर्षी ते आपले मेहुणे श्री. भिकोबा मिटबंदर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ भरघोस देणग्या देतात. अशा देणग्यांची एकूण रक्कम सुमारे दोन लाख रुपये एवढी आहे.त्यांची सुविद्य कन्या श्रीमती विजया मुझुमदार यांचा वडिलांविषयी लिहिलेला एक लेख खाली उद्धृत केलेला आहे. त्यांच्या सत्काराचे छायाचित्र पृ. १७ वर दिलेले आहे.

## My Father, PANDURANG G. BARDE, the Centenarian

Announcing my dear Father's one Hundred years of experiences and accomplishments, hopes and dreams, achievements and memories, one complete century and ten decades of life – a memorable and rare milestone.

We celebrated my father's 100 years birthday with a prayer ceremony seeking God's blessings and a beautiful function on May 7$^{th}$, 2015 at Scotch Plains, New Jersey, USA.

Pandurang Ganpat Barde was born in Mudgeri, Karwar on May 7, 1915 and grew up in ordinary circumstances but lived an extraordinary life full of professional success and great achievements.

He graduated from Pune Engineering College with B.E. degrees in electrical and mechanical engineering in 1943. He began his illustrious career by joining the Indian army as a ground engineer in World War II on the India/Burma border. After the war he was honoured with the position of Class I officer with the Civil Aviation Department of the Government of India. He was Controller of Mumbai Airport and then retired as Director of Civil Aviation in New Delhi in 1973. Soon after he was on the committee of the International Airports Authority of India, New Delhi for Indian standards on aircraft safety and fire prevention. Later he became a Consultant for many private companies in Delhi and Mumbai for his tremendous experience and expertise in aircraft firefighting equipment.

Pandurang Barde married Susheela (Gulab Tilve) on June 22, 1946. My mother was beautiful, cultured, highly educated (M.Sc in Botany from the Royal Institute of Science, Mumbai) and progressive.

Pandurang Barde immigrated to the United States in 1983 with his wife, Susheela Barde, leaving the comfort and familiarity of his motherland,

to help his daughter, Vijaya Muzumdar raise her three sons to great professional heights.

Pandurang Barde lives with his daughter, Vijaya Muzumdar in New Jersey.

He also has a son, Anand Barde and five grandsons.

United States President Obama has honoured Pandurang Barde with greetings for his 100th birthday and a congratulatory message sent from the White House, Washington, DC.

My father, the patriarch, has led an exemplary life and gave inspiration, wisdom and guidance to his family as well as selflessly helped many of his relatives and people in the community.

Vijaya Muzumdar, New Jersey
vmuzumdar@comcast.net

## कवळें मठ, वाळकेश्वर, प्रतिष्ठा सुवर्ण महोत्सव उद्घाटन समारंभात संघाच्या कलाकारांचा उत्कृष्ट सहभाग

श्री कवळें मठ, वाळकेश्वर मुंबई येथील श्री शांतादुर्गा देवीच्या मूर्तीच्या प्रतिष्ठापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष सध्या सुरु आहे. याचा उद्घाटन सोहळा रविवारी , ३ मे रोजी प्राचार्य वैद्य सभागृह, किंग जॉर्ज हायस्कुल, दादर येथे संपन्न झाला. या निमित्ताने ' एक आंनदीमय संध्याकाळ ' हा भावगीत व भक्तीगीतांचा कार्यक्रम अभय कुलकर्णी व त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्कृष्ट रीत्या सादर केला. प्रख्यात अभिनेता व गायक अमोल बावडेकर यांचा सहभाग हे या कार्यक्रमाचे खास आकर्षण होते.

श्री गौडपादाचार्य संस्थान कवळें मठ व आपला संघ यांचे नाते तसे बरेच जुने. संस्कृत पाठांतर स्पर्धा ही त्यांचे प्रतीक म्हणता येईल. आपण सगळे कवळें मठाचे अनुयायी असल्याने संघातर्फे काही योगदान देण्याच्या हेतूने काही नृत्याविष्कारांची गुंफण या कार्यक्रमात करण्याच्या राजीव बोरकर व विवेक कुलकर्णी यांच्या संकल्पनेला सौ. विपुला नाडकर्णी यांनी नृत्ये आयोजित करुन जोड दिली.

स्तुती नाडकर्णी (कथ्थक), अक्षता गुलवडी (भरतनाट्यम्), संजना राव (लोकनृत्य), ऊर्वी कल्याणपूर (बॅले) व शिशीर सामंत (कंटेपररी) यांनी अवधूत रेगे यांच्या गायनाच्या पार्श्वभूमीवर सादर केलेली विविध नृत्यप्रकारांनी नटलेली गणेशवंदना सर्वांच्या कौतुकास पात्र ठरली. कथ्थक विशारद शाल्मली झणकरच्या शास्त्रीय नृत्यातील अभिनय व पदलालित्य प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारे होते. ' राधे कृष्ण नाम ' या गीतावर कृष्ण व गोपी यांची

छेड-छाड दर्शविणारे कथ्थक शैलीतील समुहनृत्य स्तुती नाडकर्णी, मानसी नाडकर्णी, संजनाराव व रीवा नाडकर्णी यांनी प्रस्तुत करुन रसिकांची दाद मिळवली. सौ. सुजाता केणी यांनी या नृत्याच्या छोटेखानी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सर्व कलाकारांचा कवळें मठातर्फे स्मृतिचिन्हे देऊन गौरव करण्यात आला.

**डॉ. विवेक कुलकर्णी, दादर.**

## मुंबई व ठाणे मंचतर्फे संयुक्तपणे
## ' मनोरंजनाचा अनोखा कार्यक्रम '

३० मे २०१५ रोजी कर्नाटक संघ माटुंगा येथील मुबई मंच व ठाणे मंच यांनी एकत्रित येऊन केलेला सांस्कृतिक कार्यक्रम अतिशय रंगतदार झाला.

सौ. सुधा दळवी यांनी मंचातर्फे मान्यवरांचे तसेच प्रेक्षकांचे स्वागत केले. त्यांनी आपल्या संघाचे अध्यक्ष श्री. प्रेमानंद नाडकर्णी व इतर पदाधिकारी यांना रंगमचांवर येऊन दीपप्रज्वलन करण्याची विनंती केली. दीपप्रज्वलन झाल्यानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली. निवेदनाची सुत्रे श्री. मंगेश वेंगसरकर यांनी आपल्या हाती घेतली.

सुरुवातीस कु. आर्या वर्टी हिने गणेशकौतुकम् नृत्य सादर करुन गणेश वंदना झाली. लगेचच कु. अनुष्का तेलंग हिने शिवस्तुती नृत्य सादर केले. दोन्ही भरतनाट्यम् या शास्त्रीय नृत्याचे देखणे आविष्कार होते. त्यानंतर चार महिन्या पासून ते सात वर्षा पर्यंत छोट्या मुलांचा फॅन्सी ड्रेस सोहळा झाला. रियांश, इशिता, शामल, श्लोक, सानवी, ऋतुजा आणि आर्या या सर्वांच्याच पालकांनी हौसेने त्यांना तयार केले व प्रेक्षकांनीही त्यांचे कौतुक केले.

ह्या कार्यक्रमास ठाण्याचे श्री. सदानंद के देसाई यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रीत केले होते. पण प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते येऊ शकले नाहीत म्हणून ठाणे मंचच्या श्री. सुरेश पालेकर यांच्या हस्ते या बाल कलाकारांना बक्षिसे देण्यात आली .बक्षिसाचे प्रायोजन श्रीमती अपर्णा सदानंद देसाई यांनी केले. श्रीमती सुहासिनी सदानंद नाडकर्णी यांनी मुंबई व ठाणे मंचाला आपल्या पंचाहत्तरीचे निमित्त साधून प्रत्येकी रु ७५०० ची देणगी दिली

यानंतर कु. शुभम तेलग याचे सुरेल casio वादन झाले. कु. रमा जांबवडेकर व कु. सानवी थळी यांनी सुंदर नृत्ये सादर केली. कु. ऋतुजा धुमे हिने बक्षीस पात्र नाटयछटा सादर करुन प्रेक्षकांची वाहवा मिळवली. आपल्याला साधी शिटी ही नीट वाजवता येत नाही, पण श्री. विजय वागळे यांनी शिटीवर दोन गाणी वाजवली. तसेच कु. अपर्णा नाडकर्णी हिने ' आईये

मेहरबान ' व आई विनया नाडकर्णी सोबत ' कजरा मुहबतवाला ' द्वंद्वगीत छान सादर केली.

मध्यंतरातील चहापानानंतर सौ. सुधा दळवी यांनी अभार प्रदर्शन केले. विशेष म्हणजे स्वागत व आभार प्रदर्शन हे दोन्ही कोकणीतून केले.

ठाणे मंचच्या होतकरु व उत्साही महिलांनी या वर्षीही मिथिला गायतोंडे दिग्दर्शित 'लाइट कॅमेरा ॲक्शन' ही विनोदी नाटिका त्याच उत्साहाने सादर केली. प्रेक्षकांचा ही उत्तम प्रतिसाद मिळाला. नाटिकेतील सर्व कलाकार तसेच बॅक्स्टेज आर्टीस्टसनीही खूप मेहनत घेतली.

तन्वी, अनुष्का व साक्षी या दिवेकर बहिणीनी भरतनाट्यम् मधील अलारिपू प्रकार सुंदर व सफाईदारपणे पेश केला.

त्यांनतर रसिकाचा ' मोनिका टु मुन्नी ' हा आयटेम साँग चा mindblowing कार्यक्रम. रसिकाने कोरीऑग्रॉफ केलेल्या या दिलखेचक नृत्यात अपर्णा, प्राची, संवेदा, समीधा, सरीता, आरती, मिथिला, पंचमी, मेधा, सखी, रसिका, रुता, समीक्षा, श्रुती, श्रीदा, निश्चिता, या सर्वच नृत्यांगनानी जान आणली आणि ऋषी व प्रसाद या दोन मुलांनी त्यांना उत्तम साथ दिली.

या कार्यक्रमाची खरी खुमारी वाढली ती निवेदक श्री. मंगेश वेंगसरकर मुळे. सुरुवाती पासूनच त्याच्या निवेदनाची शैली जाणवत होती पण मोनिका टु मुन्नी कार्यक्रमात Between the Lines (Dances) त्यांनी आपल्या अभिनयाचे, नकलांचे जे नमुने पेश केले त्यांनी सर्व प्रेक्षकवर्ग अक्षरश: फिदा झाला.

एकेकाळी भारतीय संघात दिलीप वेंगसरकरने आपला काळ गाजवला होता आणि ३० मेला कर्नाटक संघात मंगेश वेंगसरकरने तुफानी फटकेबाजी केली. Non striker End राहुन मुलींच्या नृत्यांच्या चौकारांना दाद दिलीच. पण स्वत:ला strike मिळाल्यावर सिक्सर वर सिक्सर मारुन प्रेक्षकांना इतके खुश केले की, त्या दिवशीचा अघोषित Man of the Match (Man of the Day) चा किताब हसत – हसवत खिशात घातला.

जन गण मन ह्या राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. आजच्या प्रेक्षकांची उपस्थितीही उल्लेखनीय होती.

प्रेक्षकांची पंसती आजच्या खाऊच्या डब्यालाही मिळाली. आता आपली भेट पुढील वर्षी याच ठिकाणी.

**मंजिरी कुलकर्णी, ठाणे.**

## श्रीमती सरिता तेलंग यांना कथालेखन स्पर्धेत दुसरा क्रमांक

ठाणे येथील श्रीमती सरिता सदानंद तेलंग ( पूर्वाश्रमीच्या ललिता काशिनाथ गायतोंडे, किन्नर), वय वर्षे ८१, यांना भक्तीरसपर कविता व कथा लिहिण्याचा छंद आहे. अलीकडेच पुणे येथील 'समरसता साहित्य परिषद ' या संस्थेतर्फे कथालेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत त्यांना दुसरा क्रमांक मिळाला. एप्रिल २०१५ मध्ये पुणे येथे भरलेल्या एका खास समारंभात त्यांना प्रशस्तीपत्रक व पदक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

### प्रार्थना

मज स्मरण तुझे नित होऊ दे।
तुझेच आई, रुप माझे नयन सदा पाहु दे।।
सांज सकाळी करुनी वंदन।
नित करीते मी तुझी आठवण।
इथूनही मजला दिसे तुझी ती नजर प्रेमभरी ।।१।।
शांत हासरे मुख तव माते।
सौख्य देई माझ्या मनाते।
कृपाकर तव दावी मजला मार्ग चिर सौख्याचा।।२।।
वेड्या मना कां दूर पाही।
वसते तुझ्याच हृदयी आई ।
वर्षाव करी ती तुजवरती पाहे प्रेमसुखाचा।।

शिवशंकरा कृपा करा ।
शरण तुम्हा मी द्या मज थारा ।।
असेल चूक जरी हातून घडली।
क्षमा करुनी मज म्हणा आपुली।
पित्यासम मज द्यावी सावली ।
हरुनी आपदा हरा।
हे गौरीहरा करुणाकरा।

(प्रायोजित)

सरिता सदानंद तेलंग (ठाणे)

## असार जीवित केवळ माया रडगाणे हे गाऊ नका!

हिंदु हायस्कूलमध्ये असताना मला आमचे परमपूज्य भेंडेमास्तरांनी शिकविलेली एक कविता आठवते.

विश्वास ठेवा! Henry Wadsworth Longfellow ची Psalm of Life ही प्रसिद्ध कविता अवघ्या ४५ मिनिटांमध्ये एकाच पिरियडमध्ये त्यांनी पूर्णपणे शिकवली व ती आम्हा सर्व विद्यार्थ्यांच्या मनांत अशी ठसली गेली की त्या कवितेवर कितीही कठीण प्रश्न विचारले गेले असते तरी सर्वच्या सर्व विद्यार्थी Repeat सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तम मार्कांनी पास झाले असते.

कविता तर खरोखरच सुरेख होती व भेंडेमास्तरांनी ती अशा रीतीने शिकवली की सर्वच विद्यार्थ्यांची नजर आणि एकाग्रता त्यांनी आपल्याकडे वेधून घेतली. असा एकही विद्यार्थी नव्हता ज्याचे लक्ष मास्तराकडे नव्हते. It's a great level of the art of teaching.

कविता कशी शिकवली ते तुम्हाला सांगतो!

Tell me not in mournful words life is but an empty dream
असार जीवित केवळ माया रडगाणे हे गाऊ नका.

: : :

Be not like dumb, driven cattle! Be a hero in the strife!
मुकी बिचारी कुणी हाका अशी मेंढरे बनू नका. वगैरे वगैरे!

कवितेचे इंग्रजी भाषेतील एक चरण व त्यानंतर त्याचे श्री हरी नारायण आपटेंनी केलेले मराठी अनुवादाचे चरण भेंडेमास्तरानी आपल्या अप्रतिम हावभावासह, नैसर्गिक भावनांसह इतक्या कळकळीने सादर केले की सगळा वर्ग अगदी मंत्रमुग्ध झाला होता.

मी 'एकपाठी' तर केव्हांच नव्हतो आणि आता तर सकाळची गोष्ट संध्याकाळी आठवत नाही पण १९५३ – ५४ मधील ही कविता त्या ४५ मिनिटांच्या पिरियडमध्ये माझी मुखोद्गत झाली होती. आज ६० वर्षानंतर सुद्धा त्यातला एक एक शब्द मला आठवतो. इतकेच नव्हे तर भेंडेमास्तराच्या चेहऱ्यावरचे हावभाव, ती तळमळ माझ्या डोळयासमोर दिसते. खरंच असे शिक्षक लाभायला नशीबच लागते.

ही कविता माझी फक्त पाठच झाली नाही तर तिचा आशयही मी आचरणात आणला. तो कसा हे मी पुढे केव्हांतरी सांगेन जर संपादक दत्तात्रय नाडकर्णींनी संधी दिली तर!

खरोखरच किती भाग्यवान होतो त्यावेळी आम्ही सर्व हिंदु हायस्कुलचे विद्यार्थी! M.S. Wagle, A.D. Kulkarni, S.D. Bhende सारखे महान गुरुजन, A.K. Rao सारखे "प्रोफेसर" – ज्यांनी फक्त आम्हाला इंग्रजी शिकवले नाही तर ते स्वत: 'इंग्रजी' जगले. इंग्रज

कसा वागतो, त्याचा पेहराव कसा असतो. तो कसा "Reserved" वृत्तीचा असतो हे सर्व त्यानी आम्हाला प्रत्यक्षात आपल्या वागणुकीने शिकवले. फेणे मास्तरानी आत्मशक्ती, देशप्रेम काय असते याची चुणुक दाखवली. ब्रह्मेमास्तरांनी मी Drawing च्या कलेत किती नालायक आहे हे पूर्णपणे माझ्या मानात बिंबविले व मी माझ्या पुढील आयुष्यात Drawing शी संबंधित असलेल्या कुठल्याही व्यवसायात पडू नये हे मला पटवून दिले. मी त्याप्रमाणे वागलो आणि माझे कल्याण झाले. माझ्या बाबा-काकांनी माझ्यासमोर किती चांगले आदर्श ठेवले. गणेश पै सारखे माझे जीवाला जीव देणारे आणखी दोन मित्र आहेत. या बाबतीत मी खरोखर खूपच भाग्यवान आहे.

मी पैसाही खूप कमावला तसा गमावलाही. अशी पदे भूषवली की समोरचा माणूस - was trying to anticipate my every wish and finding ways to fulfill the same. तरी या सर्व प्रकारातून, नाना प्रकारच्या आकषर्णातून तावून सुलाखून, जर "एक चांगला माणूस" असे जर लोकांना माझ्या बद्दल वाटते तर त्याचे संपूर्ण श्रेय मी या वर उल्लेखिलेल्या माझ्या सर्व "हिरोंनाच" देतो.

कधी कधी मला आजच्या तरुण पिढीचा हेवा वाटतो तसेच कींव पण येते. आज सर्व जग त्यांच्या बोटावर कॉम्प्युटर किंवा स्मार्ट फोन द्वारे नाचते. पण तरीही मानवतेचा अर्थ आणि धर्म अजून उमजलेला नसावा असा संशय येतो. छोटया छोटया गोष्टींमध्ये आम्ही किती रस घेत होतो - आनंदी होत होतो - या सर्व प्रकारांना ते मुकले असावेत असे वाटते.

आजची पिढी किती प्रचंड हुशार आहे. लहान लहान मुले सुद्धा इतकी कुशाग्र आणि तल्लख बुद्धीची दिसतात पण मला असे वाटते की नवी पिढी खूपच व्यवहारी बनत चालली आहे. आजच्या तरुण पिढीने स्वत:च आपले कुटुंबीय, स्वकीय तसेच आप्तजन यांच्या कर्तव्याची समीकरणे (Definitions) तयार केलेली आहेत. कुटुंबीयांनी / आप्तजनांनी / स्वकीयांनी त्यांच्यावर केलेल्या नि:सीम प्रेमाचा वर्षाव सुद्धा त्यांना त्यानी ठरविलेल्या कुटुंबीयाच्या कर्तव्याच्या चाकोरीचाच एक भाग वाटतो. परस्परांचे देणेघेणे, वागणे सुद्धा एक प्रकारची सौदेबाजीच वाटते. कदाचित तरुण पिढीच्या दृष्टीने ते ठीकच असावे कारण - " Too much of attachment only brings misery" - असेच त्यांना वाटत असावे.

Thank God! माझी पिढी या विचारसरणीपासुन बरीच दूर आहे. आम्ही आमच्या गुरुजनांना सुद्धा आमच्या कुटुंबीयांचा / आप्तजनांचा दर्जा देतो व त्यात जरा सुद्धा सौदेबाजी किंवा व्यवहारीपणा नाही.

गुरुवर्य श्री. एम. एस. वागळे यांचा १९९७ साली तेंडुलकर हॉलमध्ये माजी विद्यार्थ्यांतर्फे सत्कार समारंभ करण्यात आला, तेव्हा त्यांचे बरेच माजी विद्यार्थी अमेरिकेहून

खास फक्त एकाच उद्देशाने आले होते ते म्हणजे वागळे मास्तरांनां भेटण्यासाठी. हिंदु हायस्कुलचे माजी विद्यार्थी श्री. प्रभाकर दत्तात्रय कसबेकर (P.D.Kasbekar I.A.S) जे Govt. of Maharashtra चे Chief Secretary होते व ज्यांनी शाळा कॉलेजमध्ये 1st Class 1st कधीच सोडला नव्हता., ते समारंभाचे Chief Guest होते. श्री. कसबेकरांचा मुंबई युनिर्व्हसिटीत एक रेकॉर्ड आहे आणि अजूनही तो अबाधित आहे. त्यांना १९४० च्या इंटर आर्टस् परीक्षेत सर्व पेपर्स मध्ये Highest मार्क्स मिळाले होते. व झाडून सर्वच्या सर्व पारितोषिके त्यांनाच मिळाली होती. त्यांनी श्री. चिंतामणराव देशमुख यांचा रेकॉर्ड तोडला होता. श्री. देशमुखांना सहा पेपर्समध्ये तर श्री. कसबेकरांना सर्वच्या सर्व आठही पेपर्समध्ये Highest मार्क्स मिळाले होते. याच श्री. प्रभाकर कसबेकरांनी गुरुवर्य वागळे मास्तरांच्या पदस्पर्शात, सर्व माजी विद्यार्थ्यांच्या साक्षीने, स्वत:ची धन्यता मानली होती. यापेक्षा कुठले उदाहरण देऊ गुरुशिष्यांमधील निस्सीम प्रेमाचे !

मी स्वत: संपूर्ण जग अनेक वेळा फिरलो. 'Orbit Tours' कंपनीत केवळ मजा म्हणून पाच वर्षे मी कंपनीचा Tour Director होतो. मी युरोप कमीत कमी २५ वेळा, अलास्कासह अमेरिका ५ वेळा, ऑस्ट्रेलिया ५ वेळा, जपान तीनदा व संपूर्ण South America, चीन, रशिया व इतर देश दोनदा तरी पालथे घातले असणार. सर्व जगातल्या नव्या पिढीला मी अगदी जवळून पाहिले आहे.त्यांच्या आवडीनिवडीचा बराच अभ्यास केला आहे. पण मला कोण जास्ती सुदैवी किंवा सुखी याचा काही थांगपत्ता लागला नाही. असंख्य वेळा मी विमानाने Business Class नव्हें तर First Class मधून Orbit चा Tour Director म्हणून प्रवास केला आहे. अतिशय महागडया 7 Star हॉटेलमध्येही अनेकवेळा राहिलो आहे, ते सुद्धा युरोप अमेरिकेमध्ये. Computer आणि Smart Phone चा मी अजूनही रोज उपयोग करत आहे. आजची पिढी ज्याला सुखाची परमावधी म्हणते ती सर्व सुखे मी खूप भोगलेली आहेत.

पण आई शांतादुर्गेला स्मरून सांगतो की, आजही मला असे वाटते - माझ्या आयुष्यातला सर्वात सुखद्काळ, सुवर्णकाळ किंवा ज्या काळात चांगल्या संस्कारांची आत्यंतिक जरुरी असते असा काळ, जो माझ्या मनांवर कायमचा कोरला गेलेला आहे -

"तो काळ म्हणजे हिंदु हायस्कुल - कारवारमधील मी काढलेली पाच वर्षे !"

**अरुण भास्कर कसबेकर**
९८२०२९१३६५

# Shailesh Gaitonde

**Account Consultancy**


Office : S/70, Goyal Trade Centre, Shantivan, Borivali (E), Mumbai 400066.
**Tel.:** (Off.) 022-28974402 (Mob.) 98692 11055 • **Office Time :** 10.00 a.m. to 6.00 p.m.

**COMPUTERISED ACCOUNTS SERVICES**

- **FOR COMPANIES & PRIVATE FIRMS UPTO FINALISATION**
- **FOR CO-OP HSG SOCIETIES**
  - *Monthly / Quarterly Billing & Receipts of the Society*
  - *Accounts Books are maintained on Computer*
  - *Monthly or Annual Report*
  - *Statutory Audit from Panel Auditor*
  - *Finalization of Accounts*
  - *Administration of Society*
- **For Filling of Income Tax Returns & PAN Number**
- **For Personalized & Home Service**
- **(VACANCY FOR SOCIETY MANAGER, INTERESTED AND EXPERIENCED CANDIDATE PLEASE CONTACT)**


MSIPL **MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD**

402, Business Point, Parsam Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital, Andheri (West), Mumbai 400 058
Tel No. 022-4233 2323 / 6584 1333 / 6522 6904 / 9533 / 33444




Can we help you to achieve your goal???
& your goal is...

Let's reach nearer
To your highest GOAL!!!
Step by step....




A little every month grows to something significant over time!!!
Invest Rs. 1000/- Per month & get...

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 929,000 | 1,516,900 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,477,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,496,000 | 14,900,000 |




*Indian Equity market has given avage 16% return s in last 32 year s...*

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.

# प्रतिक्रिया
## एक आदर्श

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकातील ''आम्ही खरोखरच मूर्ख आणि बावळट होतो का ?'' हा लेख वाचून आपल्या समाजात अजूनही प्रामाणिक आणि सत्याची कास धरुण चालणारी माणसे आहेत ह्याचा गर्व वाटला.

माणसाची कृती फक्त फायद्याचा विचार करणारी असून चालत नाही, ती हितकारी सुद्धा असावी लागते. पैसा किती कमावला यापेक्षा तो कसा कमावला यावर माणसाचे सुखसमाधान अवलंबून असते. आर्थिक समृद्धी पेक्षा नैतिक समृद्धी जास्त महत्वाची असते. नीतीमत्ते शिवाय घडणारे व्यवहार हे व्यक्तिगत व सामाजिक स्वास्थ्य बिघडवणारे असतात.

वेदांमध्ये धर्म, अर्थ, काम व मोक्ष असे चार पुरुषार्थ सांगितले आहेत. आधी धर्म (righteousness) व नंतर अर्थ येतो. अर्थ म्हणजे व्यापार, पैसा, नोकरी वगैरे जे धर्माच्या अधिष्ठानाखाली केले पाहिजेत. फक्त पैसा कमावणे हे जीवनाचे ध्येय असू शकत नाही. वाम मार्गाने आलेला पैसा वाममार्गाने निघून जातो हे त्रिकाल बाधित सत्य आहे. जगात खूप पैसा असलेली माणसे खूप सुखी असतात असे नाही. आपले थोर संत महात्मे धनवान नव्हते. पंरतु अनेक शतके उलटली तरी जनमानसात त्यांचे स्थान टिकून आहे.

मोह जिंकणे ही सोपी गोष्टी नाही. त्यासाठी फार मोठे धारिष्टय व आत्मसंयमन लागते. शिक्षकांनी केलेले संस्कार व वडिलांचे अचूक मार्गदर्शन यामुळे लेखकाला समोर आलेला मोह आवरता आला. प्रलोभनाच्या आहारी गेला असता तर काय कमावले असते यापेक्षा काय गमावले असते ह्याचा विचार केला तर लेखकाला त्याच्या प्रश्नाचे समाधान कारक उत्तर सापडेल असे वाटते.

जो स्वत:शी प्रामाणिक असतो तो इतरांशी तसाच राहातो. शुद्ध, निखळ अशी मैत्री जी गेली ५० वर्षे अबाधित राहिली त्याला तडा गेला असता. लहान चूक करुन मिळवलेल्या यशाचा मोह पुढे माणसाला मोठया चुका करण्यास प्रवृत करतो. गैर मार्गाचा अवलंब केला असता तर जीवनात यशस्वी होण्याकरिता लागणारी मन:शांती हरवली असती. म्हणून लेखकाची कृती ही मूर्ख व बावळटपणाची नक्कीच ठरत नाही.

हा आदर्श सध्याच्या धन केंद्रीत झालेल्या तरुण पिढीपुढे ठेवणे आवश्यक आहे.

**सौ. संगीता शिरीष वाघ, बोरीवली.**
(२८३३ ०८७०)

**माझे पप्पा ! माझे गुरु ! !माझे दैवत ! ! !**
**श्री. नीलकंठ पांडुरंग पिकळे-अंकोला**
**यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने .......**

माझ्या पप्पांचा जन्म ८ मे १९१५ रोजी झाला व त्यांचे निधन वयाच्या अवघ्या ५५ व्या वर्षी १६ डिसेंबर १९७० मध्ये पनवेलला डयुटीवर असताना हार्टअॅटेकने झाले. निधनाचे वेळी ते Asst. Commissioner of Police होते.

मुंबई - ठाणे लोकल ट्रेन मध्ये घडलेल्या " मंदा पाटणकर " खून खटल्यामध्ये अपराधींना पकडण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. कुप्रसिद्ध खूनी विष्णू बाळा पाटील जो आधी धमकी देऊन खून करत असे त्याला पप्पांनी अक्षरश: स्वत: मागावर जाऊन पकडला व त्याला बेडया ठोकून पोलीस ठाण्यात नेण्याच्या आधी आमच्या घराजवळ आणले व माझ्या आईला व आम्हा चारही बहिणींना दाखवले. कारण विष्णु बाळा पाटीलनं त्याचा नववा बळी ACP पिकळे साहेब असतील असे जाहीर केले होते व त्यामुळे आम्ही सर्व घोर चिंतेत होतो.

पुण्याजवळ जुन्नरच्या डोंगरात जे Alitalia चे विमान कोसळले होते, त्याचा शोध लावण्यासाठी, अंगात ताप असताना सुद्धा त्यांनी संपूर्ण जबाबदारी घेतली व विमानाच्या अवशेषांचा शोध लावला. तसेच शेकडो प्रवाश्यांचे मृतदेह, त्यांचे सामान वगैरे गोळा करुन डोंगरावरुन खाली आणण्याची व्यवस्था पूर्णपणे त्यांच्या देखरेखीखाली झाली.

१९६१ साली गोवा स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच जेव्हा St. Francis Xavier चे शरीर लोकांच्या दर्शनाकरिता ठेवले गेले तेव्हा लाखो लोक देशातून आणि परदेशातून दर्शनासाठी आले होते. त्यावेळी खास बंदोबस्तासाठी पप्पांना महाराष्ट्र सरकारतर्फे गोव्यांत पाठविण्यात आले होते.

एका अपरिचित माणसाने आम्हा चारही बहिणीं देखत पप्पांना विचारले - " तुम्हाला चार मुलीच ! मुलगा नाही ?" तेव्हा पप्पा म्हणले - " हे माझे चार कोहिनूर हिरे आहेत व मला त्यांचा अतिशय अभिमान आहे." त्या क्षणापासून आम्ही चारही बहिणी पप्पांना आमच्या दैवतासमान मानतो.

**सौ. मंगला (प्रभा )अरुण कसबेकर**
**९८२०२१६४४१**



'शतकवीर श्री. पांडुरंग गणपत बर्डे'
जन्मशताब्दी दिन ७.५.२०१५ (तपशील पृ. क्र. ६)



'कै. श्री. नीलकंठ पांडुरंग पिकळे' यांची जन्मशताब्दी
जन्मशताब्दी दिन ८.५.२०१५ (तपशील पृ. क्र. १६)




'मनोरंजनाचा अनोखा कार्यक्रम' (तपशील पृ. क्र. ८ वर)

**'लाईट, कॅमेरा, ॲक्शन ' या नाटकातील कलाकार**

**डावीकडून** १. मिथिला गायतोंडे, २. मंजिरी कुलकर्णी, ३. स्मिता वाघ, ४. चित्रा कामत, ५. मृणाल दळवी, ६. उमा वागळे.




'मनोरंजनाचा अनोखा कार्यक्रम' (तपशील पृ. क्र. ८ वर)

**कलाकार :- उभे :** निशीता देसाई, श्रीदा फेणे, आरती जांबवडेकर, अपर्णा नाडकर्णी, ऋता गायतोंडे, श्रुती गायतोंडे, रसिका गायतोंडे, मिथिला नाडकर्णी, अनुष्का तेलंग, समीक्षा पालेकर, पंचमी वैष्णव, मेधा सोहोनी, प्राची पालेकर, समिधा गायतोंडे, ऋषी गायतोंडे. **बसलेले :-** शैलेश गायतोंडे, मंगेश वेंगसरकर, सखी तेलंग, प्रसाद गायतोंडे, संवेदा अणावकर



‘ठाणे भिशी ग्रुप नेरळला वाघांच्या बंगल्यावर’

(तपशील पृ. क्र. २१ वर)

**डावीकडून :** प्रधान, मारुती दळवी, शिवानंद वागळे, सुधा वाघ, प्रकाश वाघ, सुरेश पालेकर, मंगेश वागळे,सदानंद देसाई, व विजय कामत.

# ठाणे भिशी ग्रुप नेरळच्या वाघांच्या बंगल्यावर

आपल्यापैकी बऱ्याच जणांना माहिती आहे की, ठाणे येथील पुरुष मंडळीचा एक भिशी ग्रुप आहे. ह्या ग्रुप मधील सभासद महिना दोन महिन्यातून एखादया सभासदाच्या घरी संध्याकाळी भेटतात, गप्पागोष्टी (पंचायत्या / फोलगा) मारतात, एकमेकांच्या विचाराची देवाण-घेवाण करतात, हौजी गेम पैसे लावून खेळतात, सुग्रास सामिश जेवणाचा व नंतर स्वीट डिशचा आस्वाद घेतात व परत आपापल्या घरी परततात.

यावेळी मात्र आम्ही जरा वेगळा भिशी कार्यक्रम ठेवला होता. आम्ही सर्वांनी श्री. प्रकाश महारुद्र वाघ यांच्या नेरळ येथील बंगल्यावर सकाळी भेटण्याचे ठरविले. श्री. सदानंद देसाई यांनी टेंपो ट्रॅव्हलर बुक केली आणि श्री. विजय कामत यांनी बाकीचे सर्व मॅनेजमेंट केले. शुक्रवारी १० एप्रिल २०१५ रोजी सकाळी ८ वाजता आम्ही ठाणे सोडले. साधारण ११ च्या सुमाराला नेरळला वाघांच्या बंगल्यावर पोहोचलो.

श्री. प्रकाश व सौ. सुधा वाघ यांनी आमचे यथोचित गरमागरम, वाफाळलेला चहा देऊन स्वागत केले. हा बंगला हिलटॉपवर आहे व बागेचे श्रेत्रफळ सुमार १०,००० चौ फुट इतके आहे. बंगल्याचे क्षेत्रफळ २००० चौ. फूट इतके असून, तीन सेल्फकंटेन्ड बेडरुम्स, हॉल, डायनिंग रुम, किचन, दोन गच्च्या, झोपाळा, वेताचा झूला आणि सर्व अद्ययावत सामान व सुखसोयींनीयुक्त असा आहे. बंगला दुमजली असून हवेशीर, आटोपशीर, भरपूर उजेड व अतिशय वेल मेंटेन्ड आहे.गच्चीवर झोपाळ्यावर बसून सूर्यास्त व माथेरानचे रम्य डोंगर बघता येतात.

चहा झाल्यावर प्रकाशने आम्हाला आपली बाग दाखविली. प्रवेशद्वार, मेन गेट जवळ, समोरील भागात, विविध प्रकारची फुलझाडे - अेक्झोर्टा, पांढरा, लाल, पिवळा, सोन व कवठी चाफा, मोगरा, पारिजातक, कुंदी, जुई, सायली, बकुळी वेगवेगळे अनंत व जास्वंदी वगैरे आहेत तर पाठीमागे व डाव्या बाजूस फळझाडे - नारळ, आंबे, केळी, चिक्कू, सीताफळ, रामफळ, निरफणस, कापाफणस, जांभ वगैरे लावली आहेत. याशिवाय औषधी वनस्पती - गवती चहा (निरवळे तण), पानफुटी, माका, अडुळसा, ब्राह्मी, डायबेटीस प्लांट लावलेली पाहिली. पूर्ण बागेचे सिंचन, स्प्रिंकलर्स ड्रिप पद्धतीने केले जाते व त्यासाठी पंप हाऊसही आहे. गाड्या पार्क करण्यासाठी शेड बांधली असून ती वेलींनी शाकारली आहे.

यावेळी आम्ही हौजी खेळण्या ऐवजी श्री. वाघ यांनी तयार केलेला रेल्वे स्टेशन्स ओळखण्याचा प्रश्नोत्तराचा लेखी पेपर लिहिला. पंधरा मिनिटांत २५ उत्तरे द्यायची होती. आणि २५ मार्क होते. नेहमी प्रमाणे आमच्या भिशीतील स्कॉलर विद्यार्थी विजय कामत १८

मार्क मिळवून (डिस्टिंक्शन मध्ये) पहिल्या बक्षिसाचा मानकरी ठरला. दुसऱ्या क्रमांकावर १ ३ मार्क मिळवून सदानंद देसाई आणि शिवानंद वागळे यांच्यात 'टाय' झाली. यावर वाघ सरांनी टायब्रेकर प्रश्न विचारला व सदानंद देसाई यांनी बरोबर उत्तर देऊन सिक्सर मारली व ते दुसऱ्या क्रमांकाचे मानकरी ठरले. हा सर्व अनुभव आम्हांला नवीन व थ्रिलींग वाटला. प्रत्येकाला आपण शाळेत जाऊन परीक्षेला बसल्याचा, आजोबाच्या वयातही बालपणाचा अनुभव आला. नंतर श्री. वाघने घातलेली वेगवेगळी कोडी आम्ही सर्वांनी सोडविली व जोक्स ऐकले.

सर्वश्री मंगेश वागळे, सुरेश पालेकर, मारुती दळवी, शिवानंद वागळे, सदानद देसाई व त्यांचे गेस्ट मित्र प्रधान, विजय कामत व प्रकाश वाघ यांनी वेगवेगळे डॉक्टर्स, शेअर्स, आपल्या आयुष्यातील विविध अनुभव सांगितले आणि हे सर्व बोलता बोलता कोल्ड आणि हॉट ड्रिंक्सचा आस्वाद घेणे चालु होते. सोबत खाण्यासाठी मिक्सड् भजी, खारे शेंगदाणे (मक्कळबीजा) खारे काजू, चिकन लॉलीपॉप, चिझलिंग्ज् वगैरे विविध प्रकार होते.

हे सर्व संपता संपता दीड वाजला व श्रीमती सुधा वाघ यांनी केलेले मटण मसाला, तांदळाची भाकर, मटण बिर्याणी, मुगाची आमटी, व्हेज कोशिंबीर, डाळीचे तोय, ताजे कैरीचे लोणचे, दही वगैरे वाढले गेले. सगळे जेवणच एवढे रुचकर, सुग्रास होते की, आम्ही सर्व पोट तृप्त होईपर्यंत जेवलो व या अन्नपूर्णेस धन्यवाद दिले. यानंतर रसगुल्ल्याची स्वीट डिश आली. एवढे खाल्यावर, अंगावर एक प्रकारची सुस्ती आली. प्रकाशने आधीच झोपण्याची व्यवस्था केली होती. आम्ही सर्वांनी छोटीशी वामकुक्षी घेतली.

परत साडेचार वाजता गवती पाने घातलेला चहा, बिस्कीटे खाऊन आम्ही ५ च्या सुमाराला परतीच्या प्रवासाला लागलो. बरोबर वाघांनी भरुन दिलेले बागेतले भाजीचे फणस (चाको), चिक्कू, जांभ वगैरे होतेच. असा हा आमचा वेगळ्याच प्रकारचा भिशीचा अविस्मरणीय अनुभव व त्याची आठवण आम्हाला आयुष्यभर येत राहील. अरे हो, अजून एक सांगायचे राहिले की, भिशीचे जमलेले रु. २००० श्रीयुत प्रकाश वाघ यांनी देणगी म्हणून ठाणे मंचाला दिले. ठाणे व मुलुंड परिसरातील कुणाला आमच्या भिशीमध्ये सभासद व्हावयाचे असेल तर त्याने श्री. सुरेश पालेकर यांच्याशी जरुर संपर्क साधावा! (९९६९४५५३७०)

निवेदक – श्री. मारुती दळवी (९९६९८२९५०५)

शब्दांकन – श्री. प्रकाश म. वाघ (९३२२४०३००३)

(प्रायोजित)

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| ओंकार अजित बोरकर, अंधेरी | व | प्राजक्ता प्रकाश पितळे, पारले |
| अमोघ उमेश बोरकर, पुणे | व | दीपीका अनिल बोरकर, पारले |
| नेहा प्रदीप देसाई, गिरगांव | व | विशाल शशिकांत पाटील, सातारा |
| योगेश सतीश कंटक, बदलापूर | व | राजवी राजेंद्र तेंडुलकर, बोरीवली |
| तन्वी सुधीर नाडकर्णी, मीरा रोड | व | अमर राजेंद्र सामंत, कांदिवली |
| मिहीर अजित नाडकर्णी, माहीम | व | उन्नती सूदन यार्दी, अंधेरी |
| प्रशांत सतीश नीलकुंद, अंधेरी | व | इरिना साजानोवा, रशिया |
| श्रुतिका शैलेश नीलकुंद, बोरीवली | व | संदेश एम्. शेट्टी, सुरत |
| ऊर्मी गिरीश रेगे, नाशिक | व | मंगेश अनिल परूळकर, माहीम |
| सतेज मिलींद वागळे, न्यू जर्सी | व | नागचंद्रिका राघवेन्द्र राव, न्यू जर्सी |

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती उमा विजय वागळे. | ठाणे | २००० |
| २. | श्रीमती पवित्रा सुनील निलकर. | जोगेश्वरी | ५००० |
| ३. | श्री प्रकाश महारुद्र वाघ. | मुलुंड | २००० |
| ४. | हितचिंतक | | ५००० |
| ५. | श्री. अनिल विठ्ठल बोरकर. | पारले | २००२ |
| ६. | श्री उमेश शंकर बोरकर. | पुणे | १००० |
| ७. | श्रीमती सुहासनी सदानंद नाडकर्णी. | माहीम | ७५०० |
| ८. | श्रीमती अपर्णा सदानंद देसाई. | ठाणे | १०००० |


**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.), Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

# कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धा

कैवल्यपूर मठाधीशांच्या आशीर्वादाने यंदाही संघाच्या विद्यमाने संस्कृत पाठांतर स्पर्धा आयोजिण्यात येत आहे. नेहमीप्रमाणे यंदाही स्पर्धकांसाठी दोन गट पाडलेले आहेत. पण शिशु गटातील कुठल्याही स्पर्धकास कुमार गटातही भाग घेण्यास मुभा आहे. प्रत्येक गटासाठी तीन पारितोषिके आहेत. पूर्व तयारी करण्यासाठी स्पर्धकांनी लवकरात लवकर पण २२ सप्टेंबर २०१५ पर्यंत आपली नावे पत्राने अथवा फोनवर (२३८७७३०१) श्रीमती भांडारकर यांच्याकडे नोंदवावी व थेट स्पर्धेच्या ठिकाणी हजर राहावे.

**स्पर्धेची वेळ :** रविवार ४ ऑक्टोबर २०१५, संध्याकाळी ४.३०

**स्पर्धेचे स्थळ :** तेंडुलकर मंगल कार्यालय, मोगल लेन, माहीम

**शिशु गट : इयत्ता ४ थी पर्यंत**

**पर्याय क्र. १ :**

**गुणो भूषयते रूपं शीलं भूषयते कुलम् ।**
**सिद्धिर्भूषयते विद्यां भोगो भूषयते धनम् ।।**
**गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा ।**
**पापं तापं च दैन्यं च हन्ति सन्तो महाशयाः ।।**
**विद्या ददाति विनयं विनयाद् याति पात्रताम् ।**
**पात्रत्वाद् धनमाप्नोति धनात् धर्मं ततः सुखम् ।।**
**सर्पः क्रूरः खलः क्रूरः सर्पात् क्रूरतरः खलः ।**
**मन्त्रेण शाम्यते सर्पो न खलः शाम्यते कदा ।।**

**पर्याय क्र. २ :**

**हंसः श्वेतो बकः श्वेतः को भेदो बकहंसयोः ।**
**नीरक्षीर विभागे तु हंसो हंसो बको बकः ।।**
**कराग्रे वसते लक्ष्मी करमध्ये सरस्वती ।**
**करमूले तु गोविंदः प्रभाते करदर्शनम् ।।**
**जलबिन्दु निपातेन क्रमशः पूर्यते घटः ।**
**स हेतुः सर्वविद्यानां धर्मस्य च धनस्य च ।।**
**उत्सवे व्यसने चैव दुर्भिक्षे शत्रुविग्रहे ।**
**राजद्वारे श्मशाने च यस्तिष्ठति स बान्धवः ।।**

## कुमार गट : इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत

पर्याय क्र. १ : पिबन्ति नद्यः स्वयमेव नाम्भः
स्वयं न खादन्ति फलानि वृक्षाः ।
नादन्ति सस्यं खलु वारिवाहाः
परोपकाराय सतां विभूतयः ।।
करारविन्देन पदारविन्दम्
मुखारविन्दे विनिवेशयन्तम् ।
वटस्य पत्रस्य पुटे शयानं
बालं मुकुन्दं मनसा स्मरामि ।।
यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः
स पण्डितः स श्रुतवान् गुणज्ञः ।
स एव वक्ता स च दर्शनीयः
सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ति ।।

पर्याय क्र. २ : गंगा सिन्धु सरस्वती च यमुना गोदावरी नर्मदा ।
कावेरी शरयू महेन्द्रतनया चर्मण्वती वेदिका ।
क्षिप्रा वेत्रवती महासुरनदी ख्याता च या गण्डकी ।
पूर्णाः पूर्णजलैः समुद्रसहिताः कुर्यात् सदा मंगलम् ।।
लक्ष्मीः कौस्तुभ पारिजातकसुरा धन्वन्तरिश्चन्द्रमाः ।
गावः कामदुधा सुरेश्वरगजो रम्भादि देवांगनाः ।
अश्वः सप्तमुखो विषं हरिधनुः शंखोमृतं चाम्बुधे ।
रत्नानीह चतुर्दशः प्रतिदिनं कुर्यात् सदा मंगलम् ।।

संकलन : सौ. विद्या वागळे, माहीम.

**श्रध्दांजली**

**कै. सावित्रीबाई (कावेरी) नागेश नाडकर्णी (सांवरपै)**

३० वे पुण्यस्मरण, निधन : रविवार २८ जुलै १९८५

तुझ्या प्रेमळ आठवणीशिवाय गेल्या ३० वर्षात एकही दिवस गेला नाही. श्रीमंगेश तुझ्या आत्म्यास शांती देवो. तुझा आशीर्वाद आमच्या पाठीशी अखंड राहो. तुझ्या स्मृतीस सादर प्रणाम.

**विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी,**


www.kccgoa.in
वीण विश्वासाची,
सोबत निसर्गाच्या
कुशीची
कुणाल कन्स्ट्रक्शन म्हणजे उत्तम बांधकाम, कल्पक
वास्तुशास्त्र आणि सर्वोत्तम सुविधांची विश्वासार्हता.
विश्वासाच्या याच विणीतून साकारलेल्या गोव्यातील
'सुखसमृद्धी' संकूलात आजच तुमची वास्तू पक्की
करा आणि मग अनुभवा निसर्गाच्या कुशीत नटलेलं
तुमचं समृद्ध संपन्न आयुष्य.
प्रदूषणविरहीत अशा वातावरणात राहून
तुम्हाला अधिक संपन्न असं मानसिक
आणि शारीरिक दीर्घायुष्य अनुभवता
येईल यात काही शंकाच नाही.
सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह,
नवदुर्गा अशा देव-देवतांच्या
सान्निध्याने पवित्र झालेला
परिसर दीर्घायुष्याचं वरदान
ठरेल हे नक्कीच.
सुखसमृद्धी
मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर, मंगेशी, फोंडा- गोवा
देखणा निसर्ग | प्रदूषणमुक्त हवा | उत्कृष्ट बांधकाम | मुबलक पाणीपुरवठा
मंगेशीचा मंगेश, म्हार्दोळची म्हाळसा
वेलिंगचा नृसिंह, मडकईची नवदुर्गा
अशा अतिशय प्रसिद्ध मंदिरांच्या
सान्निध्याने पवित्र झालेला परिसर.
फ्लॅटस् उपलब्ध: 1 रूम किचन,
1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के
प्रोजेक्ट मान्यता: गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्य: नामवंत वित्त संस्था
a Project by: कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी
मुंबई ऑफिस: श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला,
सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि:2683 3841/47/72. मोबा: 98336 36451
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in
गोवा ऑफिस: टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो,
फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321
गोवा साईट: 95/1, वेलिंग,
मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

# उदय तेलंग

## शब्दफुलांची ओंजळ

आम्हां पाचही भावंडातला भाऊ सर्वांत मोठा. तसेच आम्हा सर्वापेक्षा त्याच्यामधील ऊर्मी, उमेद आणि उत्साहही दांडगा. शिवाय खूपच बोलका. अनोळखीकडे जाऊन ओळखी – पाळखी उकरून काढून, शेवटी नात्यागोत्याच्या मुळापर्यंत जाणं जमायचं ते त्यालाच ! त्यात ती भेटलेली व्यक्ती कारवारी निघाली तर मग त्याच्या बोलण्याला नुसतं उधाण यायचं. कुठले तेलंग केरवडचे आणि कुठले बाडचे, कुठले नाडकर्णी हळग्याचे आणि कुठले सांवर पैचे हे माहीत असण्याइतपत तो कारवारकरांत मुरलेला होता. आमची तेलंगाची वंशवृक्षावळ त्याला पाठ होती. आम्ही इतर चौघं त्याबाबतीत शून्यच ! तो मला नेहमी म्हणायचा 'किते गॉ, तुमी कोणांकच वळखनात. सगळे सांगिल्ले विसरतात.' आमचा भाऊ म्हणजे माहितीचा खजिनाच होता.त्याच्या जुन्या – पुराण्या माहितीच्या खजिन्यातून मला खूपशा गोष्टी कळल्या, त्यांचा अंतर्भाव मला माझ्या त्या त्या संदर्भाच्या लेखांमध्ये करता आला. त्यामुळे त्या लेखांना मिळालेल्या महत्वाचं श्रेय मी त्यालाच देईन.

स्वातंत्र्य पूर्व काळातील कारवार – गोव्यामधील राजकीय, सामजिक स्थितीचे संदर्भ त्याच्याकडून मिळत. ब्रिटीश राजवटीत इंग्लंडहून 'सर' हा किताब मिळालेल्या संपूर्ण भारतातील केवळ चार न्यायमूर्ती पैकी, कारवारचे तत्कालीन न्यायमूर्ती चंदावरकर यांच्या सन्मानार्थ माझ्या आजोबांनी त्यांना निमंत्रित करुन आमच्या घरी दिलेली मेजवानी, (गोव्यामध्ये सहा वर्षापूर्वी एका साहित्य सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले ज्येष्ठ संगीतकार कै. भास्कर चंदावरकर यांना ही गोष्ट मी भाऊच्या सांगण्यावरुनच सांगितली तेव्हा ते अचंबीत झाले. ते न्यायमूर्तीचेच वंशज.) ब्रिटिश अधिकारी आर्थर हॉलंडसाहेब यांना सपत्नीक दिलेली मेजवानी आणि मेजवानीतल्या खाद्यपदार्थाची संपूर्ण यादी , पोर्तुगीजांच्या कार्यकीर्दीत गोव्याबाहेर जाण्यास वाहतुकीच्या साधनांची अनुपलब्धता असल्यामुळे डोळ्याच्या ऑपरेशनसाठी येणाऱ्या आजोबाच्या बहिणीने, राजघराण्यातील राण्यांप्रमाणे चक्क मेण्यात बसून काणकोण – कारवार पर्यंतचा केलेला प्रवास, संपूर्ण कारवार गावात त्याकाळी फक्त दोनच दोन गाड्यांचं (कलेक्टर आणि डॉक्टर) फिरणं, अंजदीवच्या बोटावर गोव्याहून कामानिमित्त येणाऱ्या पोर्तुगीज अधिकाऱ्यांचा सपत्नीक आमच्या आईला येऊन भेटणं अशा अनेक अज्ञात गोष्टी त्याच्याकडून समजल्या. त्याची स्मरणशक्ती एवढी जबरदस्त होती, की त्या सर्व संबंधित ब्रिटीश – पोर्तुगीज अधिकाऱ्यांची भली मोठी नांवेही त्याच्या ओठांवर होती.

तो काणकोणच्या किन्नरकर घराण्यांतला पहिला नातू. आजोबांच्या पोर्तुगीज भाषेबद्दलच्या कुतुहलापोटी तीही त्याने आत्मसात करुन घेतली. अद्ययावत गोष्टी शिकून काळासोबत पुढे जाऊन आधुनिक राहणीमानांत जगणं त्याला आवडे. तो बाजा उत्तम वाजवे. भारतीय आणि पाश्चात्य संगीत, साहित्य यामध्ये त्याला खूपच रस होता. तो कलारसिक तर

होताच, च्या उत्तम खवय्याही होता. बनवलेले प्रत्येक प्रदार्थ कौतुक करत चवीने खाणारा आमच्यातला तो एकमेव. रेसिपीज बनवण्याचीही त्याला खूप हौस होती. वडिलांच्या निधनानंतर कारवारची ओसाड झालेली आमची फुलबाग त्याने स्वत: काम करुन छान फुलवली होती.

त्याचं मित्रमंडळ हे त्याच्यासाठी खरंखुरं आनंदस्थान होतं. शाळेतील वर्गमित्रांशी असलेली त्याची मैत्री अजूनही टिकून होती. जयंत (बाळू) नाडकर्णी (अमेरिका) त्याचा खास दोस्त. आपल्या बँकेचे चेअरमन श्री. किशोर कुलकर्णी, विजय कुलकर्णी (अमेरिका), चंद्रकांत भेंडे (अमेरिका), डॉ. कृष्णा वाघांची कुंदा, आशा-अनंत हळदीपूर, डॉ. बाबा देसाई (गोवा) (संगीतकार कै. वसंत देसाईंचे पुतणे), शांता वैद्य, शशी बोरकर असा त्याचा बराच मोठा मित्र परिवार होता, जे त्याच्या जाण्याने फार फार हळहळले.

ज्ञातिबांधवातील कुणाचंही कर्तृत्व, वाङ्:निश्चय वा निधनाची बातमी कळाली, की त्याचा पहिला फोन दत्तात्रय भाऊंना जाई. ते सांगतात, उदयचा फोन म्हटल्यावर एक तास खुर्चीला खिळून राहणं हे ठरलेलं. भाऊच्या आठवणी खूप आहेत. त्या कितीही गोड असल्यातरी हुरहुर लावणाऱ्या आणि आसवे गाळणाऱ्या आहेत. भाऊ आता आमच्यामध्ये नाही हे मानायलाच मन तयार नाही.

हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हायच्या आधी, मी बरा होऊन येतो आणि मग तुला मधु मंगेश कर्णिकांच्या घरी नक्की घेऊन जातो हं. बरं तर! या त्याच्या माझ्याशी झालेल्या शेवटच्या बोलण्यावर नियतीने 'तथास्तु' न म्हणता, नऊ महिन्यापूर्वी कालवश झालेल्या माझ्या आईच्या अचेतन देहाकडे पाहून 'आतां हिच्यानंतर माझा नंबर ' या भाऊच्या कटू वाच्यतेवर मात्र क्रूर नियतीने 'तथास्तू' म्हणून त्याला आमच्यापासून दूर नेलं. माझ्या लग्नानंतर कित्येक वर्षात तिन्ही भावांची मिळून न मनवलेली भाऊबीज कधीतरी एकदा करण्याची माझी इच्छा अधुरीच राहिली. आता परत कधीही न येण्यासाठी गेलेल्या प्रिय भाऊचं औक्षण या माझ्या शद्बफुलांच्या ओंजळीनेच करण्यांवाचून मी दुसरं काय करु शकते ?

**(प्रायोजित)**

**सौ. मीरा तेलंग प्रभूवेर्लेकर, गोवा**
**(९४२०२४२३९६)**


# YOGESH D. WAGLE

**YOUR ONE STOP STOP FOR**

**•HEALTH INSURANCE •GENERAL INSURANCE •LIFE INSURANCE**
**•PERSONAL LOAN •CAR LOAN •HOUSING LOAN**
**•BUSINESS LOAN •MORTGAGE LOAN**

**ADDRESS**

C/O ROOPA MEDICAL STORES,OPP. TRAFFIC POLICE STN.,KARWAR 581 301.
MOB. - 9844127170, 9480537170. EMAIL - yogeshwagle195@rediffmail.com

## निधन

| | | |
|---|---|---|
| अनिला अरुण आरस | | |
| (पूर्वाश्रमीच्या अहिल्या जगन्नाथ मुझुमदार) | (अंकोला) | माहीम |
| महाबळेश्वर (बाबू) रामचंद्र ब्रह्मे | (सदाशिवगड) | जोगेश्वरी |
| श्रीकांत बळवंत बोरकर | (कडवाड) | दादर |
| सुलभा नागेश बोरकर | (सदाशिवगड) | पारले |
| वामन (बाबू) विश्वनाथ बोरकर | (कोडीबाग) | दहिसर |
| देवीदास पुरुषोत्तम भेंडे | (हळियाळ) | हळियाळ |
| सुशीला देवीदास कसबेकर | (कडवाड) | दादर |
| शामराव (देवीदास) नारायण कसबेकर | (कडवाड) | पारले |
| सुभाष यशवंत कुलकर्णी | (शिर्सी) | शिर्सी |
| तारा रामचंद्र मुझुमदार | (अंकोला) | वाशी |
| वृंदा अनिल मुझुमदार | (अंकोला) | दादर |
| स्नेहलता भास्कर (सुधाकर) नाडकर्णी | (अगळी) | अंधेरी |
| सुरेश (बाबू) रामराव नाडकर्णी | (बसुणगे) | जोगेश्वरी |
| वसंत वेंकटराव नाडकर्णी | (अंकोला) | दादर |
| सुशीला नागेन्द्रनाथ नीलकुंद | (शिर्सी) | अंधेरी |
| बालगंगाधर वैकुंठराव नीलकुंद | (शिर्सी) | अंधेरी |
| पुष्पा गोपाळकृष्ण राजाध्यक्ष | | |
| (पूर्वाश्रमीच्या पुष्पा प्रेमानंद पिंगे) | (कणसगिरी) | ठाणे |
| रेखा नरेंद्र रामाणी | (व्हडले बाग) | खार |
| (पूर्वाश्रमीच्या कुमुद शंकर नाडकर्णी, सांवरपै) | | |
| सुलोचना काशिनाथ सोहोनी | (गांवगेरी) | प्रभादेवी |
| दिलीप काशिनाथ सोहोनी | (गांवगेरी) | प्रभादेवी |
| सुनीती माधव तेलंग | (केरवडी) | दादर |
| मालती माधव वाघ | (हारवाडा) | अंधेरी |
| कल्पना (सुधा) जगदीश वाघ | (सदाशिवगड) | बांद्रे |
| शरदिनी गुरुदास वागळे | (अस्नोटी) | मुलुंड |
| लताबाई आत्माराम वागळे | (माजाळी) | मुलुंड |
| दिलीप मारुती वागळे | (बाड) | ठाणे |
| अनुराधा आनंद वर्टी | (हळगे) | पारले |
| सरोज श्रीपाद वर्टी | (सदाशिवगड) | बंगळूर |
| नीलिमा चंद्रहास (राजा) वर्टी | (बाड) | नाशिक |

# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

(मागील अंकानंतर)

उल्लेखनीय देणग्या

## श्रीमती अनुराधा व श्री. आनंद गणपती वर्टी यांच्या स्मरणार्थ समाजसेवानिधीसाठी दोन लाख रुपयांची देणगी

कोंकणी, कन्नड व मराठी अर्थात् 'कोकम' या तीनही भाषेत सफाईदारपणे लिखाण करणारे कै. आंनद वर्टी यांचा मागे त्यांना आपल्या संघाचे सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करुन घेतले होते, तेव्हा परिचय करुन देण्यात आला होता. २०१२ साली त्यांच्या अमृतमहोत्सवी जन्म दिनाच्या प्रसंगी त्यांच्या पत्नी श्रीमती अनुराधा वर्टी यांनी पतीच्या स्मरणार्थ वृद्धसेवानिधीसाठी ५० हजार रुपयांची देणगी दिली होती. श्रीमती वर्टी यांचे अलीकडेच ६ मे रोजी दु:खद निधन झाले. त्याप्रसंगी त्यांच्या तीन कन्या श्रीमती सुजाता मिलींद तेंडुलकर, सुवर्णा राजेश नाईक व श्रेया आशीष कोरगावकर यांनी आईवडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ समाजसेवानिधीसाठी दोन लाख रुपयांची देणगी दिली आहे.

## श्रीमती सुशीला व श्री. नागेन्द्रनाथ वैकुंठराव नीलकुंद यांच्या स्मरणार्थ दोन लाख रुपयांची देणगी

अंधेरी येथे राहणारे श्री. नागेन्द्रनाथ वै. नीलकुंद यांचे २००७ साली निधन झाले होते. त्यांच्या पत्नी श्रीमती सुशीला यांचे अलीकडेच फेब्रुवारी महिन्यात निधन झाले. त्याप्रसंगी त्यांचा नातु श्री. प्रशांत सतीश नीलकुंद यांनी आजीआजोबांच्या स्मरणार्थ वृद्धसेवा निधीसाठी व वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ प्रत्येकी एक लाख याप्रमाणे एकूण दोन लाख रुपयांची देणगी दिलेली आहे.

## श्रीमती सुशीला मुझुमदार यांच्या इच्छेनुसार समाजसेवा निधीसाठी एक लाख वीस हजार रुपयांची देणगी

पारले येथे राहणाऱ्या श्रीमती सुशीला गणपतराव मुझुमदार प्रतिवर्षी पतींच्या पुण्यतिथीच्या प्रसंगी संघाला देणग्या देत असत. गेल्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्याच इच्छेनुसार समाज सेवा निधीसाठी १२०००० रुपयांची देणगी मिळाली आहे. त्यातील एक लाख रुपये पती श्री. गणपतराव महेश्वर मुझुमदार यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आहेत, दहा हजार रुपये आई वडील श्रीमती रुक्मिणी व श्री. नारायण शिवराम नाडकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ व ऊर्वरीत दहा हजार रुपये सासूसासरे श्रीमती उमा व श्री. महेश्वर सर्वोत्तम मुझुमदार यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आहेत.

## श्री सुरेश पिकळे यांच्याकडून एक लाख रुपयांची देणगी

नालासोपारा येथे राहणारे श्री. सुरेश यशवंत पिकळे यांनी अलीकडेच आईवडील श्रीमती रमाबाई व श्री यशवंत नारायण पिकळे व बंधू सर्वश्री नागेश व महेश यांच्या स्मरणार्थ

एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे. त्यातील पन्नास हजार रुपये समाज सेवा निधीसाठी आहेत व ऊर्वरीत पन्नास हजार रुपये वृद्धसेवा निधीसाठी आहेत.

## श्रीमती उषा संझगिरी यांच्या स्मरणार्थ एक लाख रुपयांची देणगी

दादर येथे राहणाऱ्या श्रीमती उषा बाळकृष्ण संझगिरी यांचे जानेवारी महिन्यात दु:खद निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कुटुंबीयांनी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यांतील पन्नास हजार रुपये वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ आहेत व ऊर्वरीत पन्नास हजार रुपये वृद्ध सेवा निधीसाठी आहेत.

## श्री कृष्णा वागळे यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त एक लाख रुपयांची देणगी

घाटकोपर येथे राहणारे श्री. कृष्णा ऊर्फ सुनील गणपत वागळे हे आय्. आय्. टी. येथून उत्तीर्ण झालेले मेकॅनिकल इंजीनीयर, त्याशिवाय त्यांनी बजाज इन्स्टीट्युट मधून मॅनेजमेंटची पदवीही घेतली होती. ग्लॅक्सो, ब्रिटानिया सारख्या कंपनीत पंधरा वर्षे अनुभव घेऊन Arkay Systems या नावाने त्यांनी स्वत:चा कन्सल्टंन्सीचा व्यवसाय सुरु केला व अनेक प्रकल्प पूर्णत्त्वास नेले.

श्री वागळे यांचे २८ जून २०१४ रोजी अकस्मात निधन झाले. त्यांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या प्रसंगी त्यांच्या सुविद्य पत्नी व झुनझुनवाला कॉलेजच्या निवृत्त उपप्राचार्य डॉ. रश्मी वागळे यांनी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यातील पन्नास हजार रुपये वृद्ध सेवा निधीसाठी आहेत व ऊर्वरीत पन्नास हजार रुपये एज्युकेशन सोसायटीला इंजिनियरिंग किंवा एम्.बी.ए. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यासाठी आहोत.

## श्री नीलकंठ पिकळे यांच्या जन्म शताब्दी प्रसंगी वृद्ध सेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी

गेल्या पिढींत आपल्या ज्ञातीमध्ये श्री. नीलकंठ पांडुरंग पिकळे हे एक कर्तबगार पोलीस अधिकारी होऊन गेले. ८ मे २०१५ हा त्यांचा जन्मशताब्दी दिन. त्याप्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कन्या श्रीमती मंगला (प्रभा) व जामात श्री अरुण भास्कर कसबेकर यांनी वृद्धसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे. श्री पिकळे यांच्या कर्तबगारीविषयी एक लेख याच अंकात अन्यत्र दिला आहे.

श्री कसबेकर यांची वृद्धसेवानिधीसाठी ही अठरावी देणगी आहे व त्यांनी दिलेल्या देणग्यांची एकूण रक्कम ३२ लाख रुपयांहून अधिक आहे.

## कु. चित्रा भट हिची एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची कृतज्ञतेची आदर्श देणगी

शिर्सी येथील कु. चित्रा उल्हास भट ही आपल्या एज्युकेशन सोसायटीची माजी लाभार्थी. महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत एज्युकेशन सोसायटीकडून तिला प्रतिवर्षी आर्थिक साहाय्य मिळत असे. सुदैवाने उत्तम रीतीने शिक्षण पूर्ण करुन ती आपल्या व्यवसायात स्थायिक झाली आहे. अलीकडेच तिने कृतज्ञतेच्या भावनेने एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे व इतर लाभार्थींना आदर्श घालून दिला आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के. वाय. नाडकर्णी ट्रस्ट कडून | ६,००० |
| २. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या ६ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ३. | श्री माधव दत्तात्रय वर्टी यांच्या स्मरणार्थ पुतण्या श्री शांतेश अरविंद वर्टी यांजकडून | ५,००० |
| ४. | श्रीमती नीना (सुमन) दिगंबर कसबेकर यांच्या १४ व्या पुण्यतिथी निमित्त पती श्री दिगंबर मारुती कसबेकर व कन्या श्रीमती संध्या व सुजाता यांजकडून | १,००१ |
| ५. | श्री महाबळेश्वर (विनू) वैकुंठ नाडकर्णी याच्या स्मरणार्थ पुत्र डॉ. अशोक यांजकडून | २,००० |
| ६. | श्री सच्चिदानंद नागेश नाडकर्णी यांच्या १९ व्या पुण्यतिथीनिमित्त नाती कुमारी सुदिप्ता व अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून | ५,००० |
| ७. | श्री काशिनाथ त्रिंबक नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ नाडकर्णी कुटुबीयांकडून | १,००१ |
| ८. | श्रीमती मीरा (सुशीला) चंद्रकांत नाडकर्णी यांच्या ७ व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री अतुल व स्नुषा श्रीमती अंजली यांजकडून | २,००१ |
| ९. | हितचिंतकाकडून | १२,००० |
| १०. | श्री मोहन श्रीपाद फेणाणी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती रश्मी कोप्पीकर यांजकडून | १०,००० |
| ११. | हितचिंतकाकडून खालील व्यक्तींच्या गौरवाप्रीत्यर्थ | |
| | श्री दत्तात्रय नागेश नाडकर्णी | १,००० |
| | श्रीमती मृदुला गोविंद भांडारकर | १,००० |
| १२. | आईवडील श्रीमती रमाबाई व श्री यशवंत नारायण पिकळे व बंधू सर्वश्री नागेश व महेश पिकळे यांच्या स्मरणार्थ श्री सुरेश यांजकडून | ५०,००० |
| १३. | श्रामती अनुराधा व श्री आनंद गणपती वर्टी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सुजाता मिलींद तेंडुलकर, श्रीमती सुवर्णा राजेश नाईक व श्रीमती श्रेया आशीष कोरगावकर यांजकडून | २,००,००० |
| १४. | श्रीमती आशा वामन वाघ यांजकडून | ५,००० |
| १५. | कै. सुशीला गणपतराव मुझुमदार यांच्या इच्छेनुसार | |
| | पती श्री गणपतराव महेश्वर मुझुमदार यांच्या स्मरणार्थ | १,००,००० |
| | आईवडील श्रीमती रुक्मिणी व श्री नारायण शिवराम नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ | १०,००० |
| | सासुसासरे श्रीमती उमा व महेश्वर सर्वोत्तम मुझुमदार यांच्या स्मरणार्थ | १०,००० |

| | | |
|---|---|---|
| १६. | श्री देवीदास पांडुरंग बोरकर यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शैलजा व कन्या कु. सुनीता यांजकडून | ५,००० |
| १७. | संघ करत असलेल्या चांगल्या कार्याचे कौतुक म्हणून डॉ. वैकुंठ शेषगिरीराव सौंदे (शिर्सी) यांजकडून | ५,००० |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती वीणा विनायक पालेकर यांच्या स्मरणार्थ पती श्री विनायक भालचंद्र पालेकर यांजकडून | १,००० |
| २. | श्री गोविंद मारुती कसबेकर यांच्या ४ थ्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री विनय यांजकडून | ३,००० |
| ३. | श्री देवीदास नीलकंठ तेलंग व श्रीमती आंनदाबाई व श्री नीलकंठ सदाशिव तेलंग यांच्या स्मरणार्थ अनुक्रमे पत्नी व स्नुषा श्रीमती देवांगी व कुटुंबीयांकडून | १०,००१ |
| ४. | आजी व आजोबा यांच्या स्मरणार्थ कुटुंबीयांकडून | २,००० |
| ५. | श्रीमती उषा बाळकृष्ण संझगिरी यांच्या स्मरणार्थ संझगिरी कुटुंबीयांकडून | ५०,००० |
| ६. | आजी आजोबा श्रीमती सुशीला व श्री नागेन्द्रनाथ वैकुंठराव नीलकुंद यांच्या स्मरणार्थ श्री प्रशांत सतीश नीलकुंद यांजकडून श्रीमती सुशीला यांच्या निधन प्रसंगी | १,००,००० |

## वृध्दसेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री दिनकर कृष्णा दळवी (किन्नर - कारवार) यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती प्रेमा यांजकडून | २५,००० |
| २. | श्री माधव रामदास नायक यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या कुमारी मानसी हिजकडून | ३,००० |
| ३. | श्री रमाकांत शेषगिरी कुलकर्णी (अवर्सा) यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती लिली यांजकडून | १०,००० |
| ४. | श्रीमती सुमन व श्री परशुराम श्रीधर मुंग्रे (इंदुर) यांच्या स्मरणार्थ नात कुमारी नेहा राजेश (किरण) दिवेकर यांजकडून | ५,००१ |
| ५. | श्री विश्वास काशिनाथ वर्टी यांच्या स्मरणार्थ पुतण्या श्री शांतेश अरविंद वर्टी यांजकडून | ५,००० |
| ६. | श्रीमती वसुंधरा व वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती देवांगी देवीदास तेलंग व कुटुंबीयांकडून | १०,००१ |
| ७. | श्री वामन सुब्राव वाघ यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती आशा यांजकडून | ५,००० |

| | |
|---|---|
| ८. श्रीमती शांता (माई) व श्री मंगेश (भाऊ) महेश्वर नेत्रावळी यांच्या विवाहदिनाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शुभदा (गीता) वागळे यांजकडून | ९,००० |
| ९. श्री वसंत शांताराम गायतोंडे यांच्या १७ व्या पुण्यतिथी निमित्त बंधू श्री वासुदेव शांताराम गायतोंडे यांजकडून | १०,००० |
| १०. श्री मंगेश नारायण नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती ज्योती उमेश बोरकर यांजकडून | १०,००० |
| ११. अच्युतबाबा, लीला आई व माईच्या स्मरणार्थ कुटुंबीयांकडून | १,००० |
| १२. आई आणि बाबा यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कुटुंबीयांकडून | २,००० |
| १३. आईवडील श्रीमती रमाबाई व श्री यशवंत नारायण पिकळे व बंधू सर्वश्री नागेश व महेश पिकळे यांच्या स्मरणार्थ श्री सुरेश यांजकडून | ५०,००० |
| १४. श्रीमती उषा बाळकृष्ण संझगिरी यांच्या स्मरणार्थ संझगिरी कुटुंबीयांकडून | ५०,००० |
| १५. श्री सदानंद विश्वेश्वर नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती मंगला यांजकडून | ५,००० |
| १६. श्रीमती उमाबाई शंकर नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी (१४ नोव्हे. २०१४) पुत्र श्री प्रेमानंद यांजकडून | १०,००० |
| १७.श्रीमती विनता विश्वंभर गायतोंडे यांच्या १४ व्या पुण्यतिथीनिमित्त व | १०,००० |
| श्रीमती उमाबाई विश्वंभर गायतोंडे यांच्या २८ व्या पुण्यतिथीनिमित्त | १०,००० |
| अनुक्रमे बंधू व पुत्र श्री अरुणकुमार यांजकडून | |
| १८. श्री नीलकंठ पांडुरंग पिकळे यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती मंगला (प्रभा) व जामात श्री. अरुण भास्कर कसबेकर यांजकडून | १,००,००० |
| १९. श्री कृष्णा गणपत वागळे यांच्या १ ल्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती रश्मी यांजकडून | ५०,००० |
| २०. श्री मधुकर वेंकटराव नाडकर्णी यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून | २,००१ |
| २१. आजी आजोबा श्रीमती सुशीला व श्री नागेन्द्रनाथ वैकुंठराव नीलकुंद यांच्या स्मरणार्थ श्री प्रशांत सतीश नीलकुंद यांजकडून श्रीमती सुशीला यांच्या निधन प्रसंगी | १,००,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या


| | | |
|---|---|---|
| १. | आजी आजोबा श्रीमती मुक्ता व श्री मधुकर आत्माराम वाघ व काका श्री प्रदीप मधुकर वाघ यांच्या स्मरणार्थ कुमारी अनिता अविनाश वाघ यांजकडून | ५,००० |
| २. | कुमारी चित्रा उल्हास भट यांजकडून कृतज्ञतापूर्वक | ५०,००० |
| ३. | श्री के वाय नाडकर्णी ट्रस्टकडून | ६,००० |
| ४. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या ६ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ५. | श्री महाबळेश्वर (विनू) वैकुंठ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र डॉ. अशोक यांजकडून | २,००० |
| ६. | वागळें कडून | १०,००० |
| ७. | श्रीमती ललिता माधव वागळे यांच्या १७ व्या पुण्यतिथीनिमित्त | १०,००० |
| | श्रीमती सुनीती सुरेश शहापूरकर यांच्या १ ल्या पुण्यतिथीनिमित्त | १०,००० |
| | श्रीमती कमल विश्वंभर गायतोंडे यांच्या ८ व्या पुण्यतिथीनिमित्त | १०,००० |
| | बंधू श्री अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | |
| ८. | श्री सुबोध मंगेश मुळगावकर यांच्या २ ऱ्या पुण्यतिथीनिमित्त | २५,००० |
| ९. | बंधू व भगिनीच्या वाढदिवसानिमित्त कुटुंबीयांकडून | १,००० |
| १०. | श्री माधव दत्तात्रय वर्टी यांच्या ७ व्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून | १,००० |
| ११. | श्री कृष्णा गणपत वागळे यांच्या १ ल्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती रश्मी यांजकडून इंजिनियरिंग किंवा एम्. बी. ए मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यासाठी | ५०,००० |
| १२. | दिवंगत नातेवाईक व मित्रांच्या स्मरणार्थ श्री जगदीश पांडुरंग वाघ यांजकडून | १०,००१ |

(ठाणे मंच देणगीदारांची यादी पृ. २३ वर)

(उर्वरीत देणग्यांचा तपशील जागेअभावी पुढील अंकी)

Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80

BOOK - POST

LIMITED PERIOD OFFER

EDUCATION LOAN

FOR HIGHER STUDIES IN INDIA & ABROAD
INTEREST RATE 11.50% p.a.

0.25% CONCESSION
IN RATE OF INTEREST
TO FEMALE STUDENTS

एन्केजीएस्बी
को-ऑप. बँक लि.

NKGSB
CO-OP. BANK LTD.

Regd. Office: Laxmi Sadan, 361, V.P. Road, Girgaum, Mumbai - 400 004
care@nkgsb-bank.com | Web: www.nkgsb-bank.com | Customer Care No.: 022 2860 2000


हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.